(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT /Vol. XII / Issue – I ISSN 2277-8063

# महात्मा गांधीजींचे मुलोद्योगी शिक्षण

**विजयकुमार शंकरराव शिंदे** संशोधक विद्यार्थी मराठी विभाग इस्लामपूर ता. वाळवा जि.सांगली

---

**प्रस्तावना -**

भारतीय स्वातंत्र्य लढ्यात महात्मा गांधीजींनी अनन्यसाधारण असे योगदान दिले आहे. गुजारतमधील मधील पोरबंदर येथे 2 ऑक्टोंबर 1869 साली जन्माला आलेल्या गांधीजींनी परदेशात जाऊन बॅरिस्टरपर्यंत शिक्षण पूर्ण केले पुढे भारतात आल्यावर भारतीय स्वातंत्र्य लढयाचे नेतृत्व स्विकारले. 1920 साली लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर स्वातंत्र्य लढयाचे अग्रणी म्हणून संपूर्ण जबाबदारी त्यांच्यावर पडली. धर्म, सत्य, दया, क्षमा, शांती, सदाचार या गुणांचे महत्त्व समजून घेऊन तसेच अनेकांच्या व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास करून त्यांनी पारंपारिक लढयाला अहिंसेचे स्वरुप दिले व इंग्रजांना ''चले जाव'' ची घोषणा दिली.

अहिंसेचे अस्त्र वापरून महात्मा गांधीजींनी संपूर्ण देश एका विचारात बांधला. तत्कालिन समाजाने गांधीजींचे नेतृत्व मानून स्वातंत्र्य लढ्यात त्यांची साथ दिली. राजकीय सामाजिक क्षेत्रात कार्य करत असताना स्वदेशीचा स्विकार हा नारा त्यांनी भारतीयांना दिला. यासाठी चरख्यावर स्वत: सुतकताई करून कापड विणायला सुरुवात केली. स्वत: स्वदेशी (खादी) कपडे वापरायला सुरुवात केली चरख्याचा प्रसार करत असताना त्यांच्या लक्षात आले की शिक्षण क्षेत्रात सुद्धा स्वावलंबन गरजेचं आहे. म्हणून 23 ऑक्टोबर 1937 रोजी त्यांनी ''नई तालीम" या नवीन शिक्षण पद्धतीचा विचार मांडला. मूलभूत शिक्षण खूप महत्त्वाचे आणि मूल्यवान आहे. ही शिक्षणपद्धती वर्धाशिक्षण योजना, 'बेसिक एज्युकेशन' व मुलोद्योगी शिक्षण पद्धती या नावाने ओळखली जाते.

**मुलोद्योगी शिक्षण प्रणाली -**

भारताच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक व शैक्षणिक क्षेत्रात म. गांधीजींनी आपल्या कार्याचा ठसा उमटविलेला आहे. सत्य आणि अहिंसा या तत्वाच्या आधारे भारतीय स्वातंत्र्याचा लढा लढणारे गांधीजी हे पहिले क्रांतिकारी होत, महात्मा गांधीजी यांच्यावर पाश्चिमात्य विचारवंत थोरो, रस्किन व टॉलस्टॉय यांच्या विचारांचा मोठा प्रभाव होता. त्यामुळेच गांधीजींनी मांडलेले धार्मिक व शैक्षणिक विचार हे आजच्या काळातील समाजव्यवस्थेला आदर्श ठरतात. यापैकीच गांधीजीनी मांडलेली मुलोद्योगी शिक्षण प्रणालीची कल्पना "टॉलस्टॉय" च्या आश्रमातील परिस्थितीतून त्यांना सुचली.

मुलोद्योगी शिक्षण संकल्पना भारतीय संस्कृतीवर आधारलेली असून यात विद्यार्थ्यांच्या मुलभूत गरजा व अभिरुचीचा जवळचा संबंध आहे. या शिक्षण प्रणालीतून अवतीभवतीच्या वातावरणाचे ज्ञान विद्यार्थ्यास प्राप्त होते. विद्यार्थ्यांना हस्तोद्योगाचे शिक्षण दिले जाते. ज्यामुळे विद्यार्थी आपल्या उदरनिर्वाहाचा प्रश्न सोडविण्यासाठी सक्षम बनतो. मुलोद्योगी शिक्षण प्रणाली जीवनाभिमुख असून स्वावलंबन, स्वाभिमान व श्रमप्रतिष्ठा या तीन सूत्रांवर आधारलेली आहे.

**मुलोद्योगी शिक्षण प्रणालीशी वैशिष्टये -**

1) शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावे.

2) शिक्षण हे स्वाश्रयी असावे.

3) विद्यार्थ्यांनी शाळेत निरनिराळया वस्तू तयार कराव्यात व त्या विकून जे पैसे जमतील त्यातून शाळेचा खर्च अंशत: भागवला जावा.

4) 7 ते 14 वयोगटातील विद्यार्थ्यांना सक्तीचे व मोफत शिक्षण दिले जावे.

5) शिक्षणातून, दृढनिश्चय व नेतृत्व क्षमता विकसित होते.

**मुलोद्योगी शिक्षण प्रणालीची अध्यापन पद्धती -**

महात्मा गांधीजीचे शैक्षणिक तत्वज्ञान समग्र शिक्षण आहे. गांधीजी प्रणित शिक्षण पद्धती ही विद्यार्थी केंद्रीत होती. शिक्षकाची भूमिका केवळ मार्गदर्शकाची होती. मुलातील सुप्त गुणांचा शोध घेऊन त्यांच्या आवडी

निवडी, कल, अभिरुचीचा विचार करून शिक्षकांनी शिकवावे हे त्यांना अभिप्रेत होते. त्यानुसार त्यांच्या मुलोद्योगी शिक्षण प्रणालीच्या अध्यापन पध्दती त्यांनी सांगितल्या आहेत.

**1) स्व-अनुभवातून शिक्षण -**

आजचे विद्यार्थी हे उद्याचे भावी नागरिक आहेत त्यामुळे त्यांना अतिशय जवाबदारीने शिकविले पाहिजे. म्हणून अगदी लहानपणापासून बालकाला जेवढे अधिक स्वानुभव घेऊन शिकता येईल तेवढेच त्यांचे ज्ञानविश्व अधिक समृद्ध होईल दैनंदिन जीवनाशी निगडित अनुभव देवून त्याला अनुभवाद्वारे शिक्षण द्यावे. जीवन शिक्षण हे प्रत्यक्ष अनुभवातून घ्यावे असा त्यांचा आग्रह होता.

**2) कृतीद्वारा शिक्षण -**

महात्मा गांधीजीनी या शिक्षणप्रणालीद्वारे सूतकताई, विणकाम, शेती, पुस्तक बांधणी, मातीकाम, हस्तकला, बागकाम या सारख्या कृतीयुक्त उपक्रमांचा समावेश केला होता. त्यांनी स्थापन केलेल्या आश्रमशाळा या प्रयोग शिक्षणाच्या प्रयोग शाळाच होत्या त्याद्वारे प्रत्येकाला कृतियुक्त शिक्षण दिले जाते होते. विशेषत: प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या विकासासाठी या पद्धतीचा वापर केला जावा असे नमूद केले होतो.

**3) समन्वयातून शिक्षण –**

या पद्धतीत शिक्षणातून जीवनाशी समन्वय साधणे हे उद्दिष्ट मानले गेले होते. त्यामुळे जीवनाधिष्ठित अनेक बाबींचा अभ्यास विद्यार्थ्यांनी करावी असे गांधीनी सांगितले होते. विद्यार्थ्यांना विषयाचे ज्ञान एकसंघपणे दिले जावे अशा विचाराचे ते पुरस्कर्ते होते.

**मुलोद्योगी शिक्षणाची उद्दिष्ट्ये -**

मुलोद्योगी शिक्षण प्रणालीची प्रमुख उद्दिष्टे खालील प्रमाणे -

**१) व्यक्तिमत्वाचा सर्वांगिण विकास:-**

म. गांधीजींनी सांगितलेली मुलोद्योगी शिक्षण प्रणालीची संकल्पना मन, मेंदू आणि मनगट अर्थातच विद्यार्थ्याचा शारीरिक, मानसिक व बौध्दिक विकास साध्य व्हावा व याद्वारे विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होवून आदर्श चारित्र्य निर्मिती घडावी हे अपेक्षित आहे.

**२) जीवनाशी समवाय :-**

मनुष्य हा समाजशिल प्राणी आहे. दैनंदिन जीवन जगताना त्याचा संबंध घर, गांव, समाज यांच्याशी येत असतो. त्यामुळे समाजाशी त्याचे निकोप नाते जडावे असे - शिक्षण त्याला प्राप्त व्हावे.

**३) सर्वोदय समाज निर्मिती :-**

जो समाज दृष्प्रवृत्ती व दोषापासून मुक्त असेल अशा समाजात त्याग, सहकार्य, समभाव, प्रेम, आत्मविश्वास अशा गुणांनी युक्त व्यक्ती तयार व्हावी त्याने श्रमाला महत्त्व देवून समाजाप्रति श्रमसंस्कृती जोपासावी.

**४) आदर्श नागरिक निर्मिती :-**

मुलोद्योगी शिक्षण प्रणालीद्वारे बालकांच्या समोर आदर्श निर्माण करून त्यांच्यावर आदर्शत्वाचा संस्कार करावा. त्याला आदर्श नागरिकत्वाचे धडे मिळावेत. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक- दृष्टया आदर्श नागरिक निर्माण व्हावेत. हे उद्दिष्ट महत्त्वाचे मानून मुलोद्योगी शिक्षण प्रणाली मांडली आहे.

**५) आर्थिक स्वावलंबित्व:-**

मुलोद्योगी शिक्षणाचे आर्थिक स्वावलंबित्व ही प्रमुख उद्दिष्ट मानले जाते. विद्यार्थ्यांनी आश्रमात तयार केलेल्या वस्तूंमधून निर्मित खर्चातील काही भाग भरून काढणे व शिक्षण पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांच्या उदरनिर्वाहाची गरज भागविणे असा दृष्टीकोन समोर ठेवून आर्थिक स्वावलंबित्व तयार करावे.

**मुलोद्योगी शिक्षण प्रणालीतील शिक्षक -**

मुलोद्योगी शिक्षण प्रणालीनुसार ज्या भागात शाळा आहेत त्यांच भागातील व्यक्तीची शिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात यावी. शिक्षकाची भूमिका ही मार्गदर्शकाची असावी. विद्यार्थ्यांना कृतीयुक्त पद्धतीने ज्ञान द्यावे. शिक्षक हा सहिष्णू, धैर्यशील, त्यागी व चारित्र्यसंपन्न असावा असे अपेक्षित आहे. यासाठी प्रशिक्षित शिक्षकांना प्राधान्य देण्यात

यावे असे नमूद केले आहे. महात्मा गांधी बालकेंद्रीत शिक्षणाचे समर्थक होते त्यांच्या तत्त्वानुसार शिक्षण प्रक्रियेत शिक्षकांचे स्थान मार्गदर्शक मित्र असे आहे.

**समारोप:-**

मुलोद्योगी शिक्षण प्रणाली भारतीय शिक्षण प्रणालीला मिळालेली एक मौलिक भेट आहे. आजच्या शिक्षण पद्धतीनेही मुलोद्योगी शिक्षण पध्दतीतील विचार स्वीकारले आहेत कृतीव्दारा शिक्षण, व्यावसायिक शिक्षण, या तत्वांचा आज शिक्षणात अवलंब केला जातो. भारतीय कृषीधारित अर्थव्यवस्था असल्याने कृषीला पूरक हस्तोद्योगाचे शिक्षण विद्यार्थ्यांस दिले तर मानवीसंसाधनाचा योग्य वापर होवून देशाच्या आर्थिक विकासालाही हातभार लागेल असा गांधीजीचा विचार होता. अध्यात्मवाद, निसर्गवाद कार्यवाद अशा त्रिवेणी संगमांचा अंगीकार असणारी ही योजना गरजाधिष्ठित अभ्यासक्रमानुसार आधारित होती आणि आज अशा शिक्षण योजनेची समाजाला गरज आहे. मुलोद्योगी शिक्षण प्रणाली ही महात्मा गांधीजींच्या वैचारिकतेचे अनमोल असे फळ होते. आज 21 व्या शतकातही त्यांच्या विचारांची गरज आहे.

**संदर्भ:**-

* जाधव व्ही के, आधुनिक भारताचा इतिहास (२००४), नागपूर :विद्या प्रकाशन

* गांधी मो.क, सत्याचे प्रयोग (आत्मकथा) (१९६५), अहमदाबाद: नवजीवन प्रकाशन मंदिर

* भगत रा.तु. शिक्षणातील घोर विचारवंत (२००५), कोल्हापूर: चैतन्य प्रकाशन.